# संकटातील संधी

आपण एखादा विडीओ गेम खेळत असतो आणि त्यात अचानक एका  नव्या  आव्हानात्मक पातळीची भर पडते. खेळात माहीत नसलेल्या अनेक संकटांचा सामना आपण विनातयारी करायला लागतो आणि एका अनिश्चित अशा अनुभवात जातो, अस्वस्थ होतो. असे आपले सध्याचे जीवन झाले आहे. या अवस्थेतून जाताना, मला लहानपणी वाचलेली रॉबिनसन क्रुसोची गोष्ट आणि मोठेपणी पाहिलेला 'कास्ट अवे' सिनेमा सतत आठवतो आहे. या कथेतील नायक एका निर्जन बेटावर अडकतो आणि स्वत:कडे असलेले सगळे अपुरे आहे याची पुरेपूर जाणीव त्याला होते. नाउमेदी, चीड, असहायता, एकाकी पडल्याची  भावना त्याला जखडून टाकते. स्वत:ला बदलल्याशिवाय, नवे काहीतरी शिकल्या शिवाय, आणि धाडसाने पुढे गेल्याशिवाय काही पर्याय नाही असे त्याला जाणवते आणि चिकाटीने हा नायक अनेक वर्ष परिश्रम करून एक सर्जनशील जीवन जगायला लागतो. स्वत:च स्वत:चा नायक बनतो! अशीच काहीशी वेळ आपल्यावरही आली आहे. पहिल्यांदा लहान मुले, पालक, शिक्षक, शासन, समाज एका प्रतलावर आले आहेत आणि कोविडने आपल्यावर आणलेल्या परिस्थितीचा सामना करू पाहत आहेत. साधारण मार्च २०२० अखेर ते मे २०२०  अखेर आपण  कोण कोणत्या अस्थिरतेतून गेलो आहोत ते पाहू या.

१. दहावीचा शेवटचा पेपर राहिल्याने आपले कसे होणार ही चिंता  दहावीच्या मुलांना तर नववीच्या बऱ्याचशा मुलांना आपली दहावी सुरु झाली का नाही ही चिंता, त्यात ऑनलाईन दहावीची निराळीच कथा.
२. शाळा सुरु करणे हा तर एक मोठाच ताणाचा विषय होऊन बसला आहे. आता जी मुले तंत्रज्ञानाला सरावली ,त्यांना  परत समोरासमोर शिकण्याची गोडी लागेल का? जी मुले या प्रवाहाच्या संपूर्ण बाहेर आहेत ती शाळा सुरु झाल्यावर येतील का गळतील?
३. लहान मुले, ज्यांना मायेचा स्पर्श, जवळीक याची शिकण्यासाठी गरज आहे त्यांच्यावर "दो गज की दुरी" चा काय परिणाम होईल?
४. तंत्रस्नेही शिक्षण आणि प्रत्यक्ष शिक्षण यातील अंतर कसे कमी करता येईल?
५. आजवर स्क्रीन टाईम नियंत्रणाखाली ठेऊ पाहणा-या पालकांना मुलाना स्क्रीनवरूनच शिक्षण आणि मनोरंजनाचा पर्याय दिल्यावर पुन्हा कसा स्क्रीन कमी करायचा हा यक्ष प्रश्न?
६. स्क्रीनवरून शिकताना जाणवणारी एक मानसिक पोकळी कळतीये  पण वळत नाही आणि त्यामुळे होणारे काय परिणाम होत आहेत हे न समजल्याने मुलांचा होणारा गोंधळ कसा कमी करायचा?
७. पालक म्हणून आता कोणती भूमिका स्वीकारायची? स्वत:चे अस्थिर आर्थिक जीवन आणि आपल्यावर अवलंबून असलेल्या सदस्यांची काळजी नक्की कशी घ्यायची? वेबिनारच्या भाऊ गर्दीतून निवड तरी नेमकी कशी करायची? जिथे केवळ अफवा, गैरसमज आणि अपुरी माहिती आहे त्या ठिकाणी तर एकमेकांवर विश्वास कसा ठेवायचा ?
८. हे वर्ष केवळ जगायचे आहे, स्वत:ला बदलायची वेळ आली आहे, पुनर्रचना करायची आहे पण नेमके काय आणि कसे?

हे आणि असे असंख्य प्रश्न एक मानवजात म्हणून आपण वेगवेगळ्या भूमिकेतून सोडवत आहोत. सर्वच शास्त्रे आपापल्या परीने हा प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याकडे असलेले ज्ञान खुले करत आहेत. आणि हीच सर्वात मोठी संधी आहे संकटातील मार्ग शोधण्याची. जर आज आपण पुन्हा एकदा 'शिकते'  झालो तर या गोंधळाच्या परिस्थितीत, दुसऱ्यावर पूर्णपणे अवलंबून न राहता

आपण सक्रीय आहोत, प्रवाही आहोत आणि उन्नत मानवाच्या व्यक्तिमत्वाकडे प्रवास करत आहोत ही भावना आपल्याला प्रेरणा देईल. सर्वात आधी आपण विकासाच्या अवस्थेत आपल्यात कोणत्या दोन स्थिती येतात हे समजावून घेऊ. लहान मुले त्यांच्या सर्व विकासाच्या क्षेत्रात त्यांचा समतोल घालवताना आणि कमावताना दिसतात. म्हणजे एका टप्प्यावरून दुसऱ्या टप्प्याकडे जाताना मुले आपल्याला बावचळलेली दिसतात. तेंव्हा आपण त्यांना अस्थिर आहेत, चंचल आहेत, नेटकी नाहीत असे साधारणपणे म्हणतो. मुले मात्र या असमतोल अवस्थेत खटपटीत असतात ते स्वत:चे कौशल्य सरावाने नीट करण्यात, स्वत:हून शोध घेत स्वत:चे विचार पक्के करण्यात! मग काही काळाने आपल्याला मुलांमध्ये काही बदल जाणवतात. आपण त्यांना शहाणी झाली असे म्हणतो आणि मुले इतर कोणत्यातरी बाबतीत अस्थिर होतात. खरे तर हे चक्र चालूच राहते. मोठेपणी आपल्याला त्यावर कोणी ऐकवत नाही इतकेच! तर हा असमतोल खूप महत्त्वाचा आहे कारण त्यात कौशल्ये, विचार आणि वृत्तीचा विकास होतो. आपण आत्ता अगदी हाच अनुभव घेत आहोत. अनिश्चितता कशी हाताळायची याचा अनुभव आपला मेंदू घेतोय आणि खूप चांगला बदल होण्याची संधी आपल्याला आली आहे असे मानूया.

मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर कम्फर्ट झोन (सहजतेचा परीघ ) सोडला की माणूस प्रगती करतो कारण त्याला नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या प्रक्रिया निर्माण कराव्या लागतात. आता अगदी तोच काळ आहे. आपल्या मुलांसमोर आपण जर नवनवीन गोष्टी आजमाउन पाहतो आहोत तर नक्कीच मुलांना आपल्याकडून एक जीवनकौशल्य शिकण्याची संधी देत आहोत.

शिक्षण शास्त्राच्या दृष्टीने पहिले तर अत्यंत महत्वाच्या सत्याचा उलगडा होईल. सर्वच शिक्षणतज्ञांनी हे वारंवार समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे की 'काय **शिकायचे'** यापेक्षा **'कसे शिकायचे'** यावर अधिक भर देणे महत्त्वाचे आहे, कारण काय शिकायचे हे काळानुरूप बदलत जाते. आणि आपण सगळे याचा पुरेपूर अनुभव घेत आहोत. मला शिकता येतंय का? हा मूलभूत प्रश्न आपल्यासमोर आहे कारण या रोगट परिस्थितीत सांगून सुद्धा मास्क खाली करून थुंकणारे, गर्दी करायची नाही हे माहीत असून भाजीच्या ठिकाणी घोळका करणारे महामानव आपण पाहतच आहोत. एखाद्याला रोगाचा सामना करावाच लागला तर त्याला परत मोकळेपणे स्वीकारणारे समाजभान अजून शिक्षणाने शिकवले नाही. आणि आता शाळा परत सुरु करून परत फक्त पाठ्यपुस्तकातलेच शिकण्याची योजना करण्यात आपण गुंतले पाहिजे का, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा नाहीतर संधी आली आणि गेली असे होऊन बसेल. आपल्या नव्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे मुलांना आपण तीन गोष्टी आत्मसात करायला मदत केली पाहिजे. त्या म्हणजे स्वतंत्र विचार करणे, चिकित्सक विचार करणे आणि सर्जनशील विचार करणे. या तीन मूलभूत विचार प्रक्रियांच्या मदतीने मुले २१व्या शतकाला लागणारी सर्व कौशल्ये मिळवू शकतील. आता या विचार प्रक्रिया आपण पालक म्हणून, शिक्षक म्हणून प्रयत्नपूर्वक विकसित करू शकतो. आपल्या रोजच्या जीवनात हे शक्य आहे. कारण मघाशी म्हटल्याप्रमाणे आता आपण सर्व एका प्रतलावर आहोत. आपल्या देशाने दिलेल्या या त्रिसूत्रीवर जर आपण सगळ्यांनी मिळून काम केले तर आपण एक मोठा टप्पा गाठू शकू. पण हे साधायचे कसे? शिक्षणशास्त्राला भारतीय आणि पाश्चात्य विचारवंतानी एक उत्तम शिक्षण पद्धती सुचवली आहे आणि आताच्या काळात त्याची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. ती म्हणजे प्रकल्प पद्धती. आजवर अनेक वेगवेगळे अर्थ या प्रकल्प पद्धतीबाबत लावले गेले. आणि सर्वात चुकीचा अर्थ म्हणजे रात्री उशिरा दुकानातून पटकन काही चित्रे आणून अथवा इंटरनेटवरून नक्कल केलेले घाईघाईने , चिडून , चिकटवून दिलेले काम! प्रोजेक्ट दिले म्हणजे कृती दिली आणि त्याने स्वयंअध्ययन झाले असा परस्पर समज देखील मोठ्या

प्रमाणत रुजला. परंतू प्रकल्प या शब्दातच प्रयोग, कल्पना आणि  सहभाग हे अध्यारुत आहेत. ‘कल्प’ म्हणजे करण्याजोगे. म्हणून करण्यासारखे प्रयोगशील शिक्षण म्हणून प्रकल्पांकडे पहिले पाहिजे. या पद्धतीबाबतचा गैरसमज काढून टाकला  पाहिजे. जॉन ड्युयी, लेव्ह व्हायगॉटस्की यांनी मुलांनी आणि मोठ्यांनी एकत्र एका ठरवलेल्या विषयावर सखोल काम करण्यासाठीची जी गरज मांडली ती भागवण्यासाठी  प्रकल्प पद्धत  अगदी योग्य ठरते.  मुलांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासासाठी प्रकल्पाची रचना पूरक ठरते. मुलांना काय यायला हवे याचे उत्तर आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्यात आहे. मुलांच्या क्षमता वाढायला हव्यात आणि प्रकल्प तर मुलांच्या क्षमतावृन्दाला चालना देतो. आजच्या संकटकाळी तर हा पर्याय अगदी खात्रीने वापरायला हवा. आजही अनेक पालक या मानसिकतेत असणार आहेत की जरी शाळा उघडल्या तरी मुलांना पाठवावे का? त्यामुळे जर थोडा प्रयत्न करून बघितला, तर  घरात असलेल्या आणि घराजवळ असलेल्या मुलांचे मर्यादित  संख्येचे गट केले तर मुले आणि मोठी माणसे आणि शिक्षक सुद्धा या वर्षी एका नव्या पद्धतीने काम करू शकतील.  काही सोपी पथ्ये पाळली तर प्रकल्प यशस्वी होतात.

१. सर्वांनी मिळून एक विषय निवडायचा. निवडताना हाच विषय का निवडायचा याबद्दल मते मांडायची आणि स्वीकारायची
२. स्वतःच्या सहभागातून , कृतीतून करता येतील अशी कामे नियोजित करायची.
३. वेळेचे नियोजन करायचे आणि पाळायचे
४. प्रसन्नता आणि स्वीकार अनुभवायचा आणि दर्शवायचा
५. अपेक्षा आधीच चर्चेतून ठरवायच्या
६. सादरीकरण, संकलन, मुलाखत अशा पद्धती गांभीर्याने वापरायच्या
७. धीराने , संयमाने एकमेकांचे ऐकून घ्यायचे
८. चूक, बरोबर च्या चौकटीत काही बसवायचे नाही, तर सतत तपासात रहायचे आणि भर घालत राहायचे. याने  सातत्यपूर्ण शिकण्याची सवय लागते.
९. ज्ञान, कौशल्य आणि मानसिकता या तिन्हीचा समतोल राखायचा
१०. आपले मूल्यमापन कसे करायचे हे ही स्वतःच ठरवायचे आणि त्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचा वापर करायचा.  हार्वर्ड गार्डनरने सांगितलेल्या बहुविध बुद्धिमत्ता यांचा वापर करून या मूल्यमापनाचे निकष ठरवायला मदत होईल.

प्रकल्पाची साखळी ही नियोजन, प्रत्यक्ष काम / अनुभव, अनुभवांचे सादरीकरण आणि जतन आणि पुन्हा पुढील कामांचे नियोजन अशी फिरत राहते. ही थोडी सैलसर वाटली तरीही काम करताना ती नक्की बांधीव आणि रेखीव  होत जाते.

प्रकल्पाची सुरुवात करताना छोट्याश्या, जीवनाशी निगडीत असणा-या विषयाने केली तर नियोजन करणे सोपे जाते .  प्रकल्पाचे विषय अगदी साधे असू शकतात जसे, ‘घरातील सफाई’. अत्यंत महत्त्वाचा आणि घरातील सगळ्यांच्या सहभागाचा हा विषय होऊ शकतो. घरातील सफाईच्या गरजा, त्यासाठीच्या प्रक्रिया, साधने, वेळ, उत्पादने, खर्च, नियोजन, सफाई करणा-याची मानसिकता, सफाई आणि सौंदर्य, पारंपारिक निर्जंतुकिकरण आणि आजची साधने, कामाची गोडी आणि त्यातील नाविन्य इथ पासून सुरु होऊन देशाच्या स्वच्छतेकडे  हा प्रकल्प सहज वळेल. आज देशाला प्रत्येक घर स्वच्छ आहे असे चित्र जर मिळाले तर यापुढील काळात रोगराई आणि महामारीला खूप परिश्रम करून आपल्यात शिरावे लागेल. प्रकल्पाची नैसर्गिक प्रवृत्तीच अशी आहे की सगळेच त्यात सहाध्यायी बनतात. आणि त्यामुळे आपण मिळून काहीतरी नवीन उपयुक्त करत आहोत ही भावना वाढीला

लागते. प्रकल्पाची खासियत अशी की त्यातील कामे करताना बुद्धीला आपोआपच शोधाची संधी मिळते . हे पाठ्यपुस्तकातील धड्यासारखे मर्यादित नसतेच. नियोजन ते उपयोजन अशी एक मालिका प्रकल्पात विकसित करणे शक्य असते. मुलांमध्ये असलेली ऊर्जा केवळ कामे पूर्ण करणे, त्यातील आव्हाने घ्यायला वापरली जाते. विनोबांनी जीवन आणि शिक्षण हे वेगळे नाही हे प्रकर्षाने समजून सांगितले. ती आज आपण परत एकदा उजळणी करून त्याचा अर्थ लावून घेतला पाहिजे. शिक्षण हे त्या त्या परिस्थितीशी मिळते जुळते असायला हवे म्हणजेच बदलते हवे हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रकल्प नेमके हेच साधतात. शिक्षण म्हणजे काय तर स्वत:च्या प्रयत्नाने, इतरांच्या साथीने, जीवनाला उपयुक्त अशा विचार, भावना आणि कृतींचा योग्य मिलाफ. आता यात लहान, मोठा असे काही नाही, मुलांनी आपल्याकडून आणि आपण मुलांकडून शिकणे असे व्हायला हवे. हे ज्यांना शक्य वाटते, अशा पालक -शिक्षक गटाने प्रयोग करून शासनाला मदत केली पाहिजे. कारण या काळात आपल्या मुलांना दीर्घ काळासाठी उपयुक्त पडतील अशा पद्धती शोधून काढण्याची गरज सगळ्यांना आहे. जितके सघन प्रयोग होतील तितके जास्त चिंतन होऊन मुलांचे भले होईल. आपल्या भोवतीची परिस्थिती तिची ती बदलत नसते आपला सहभाग त्यात आवश्यक असतो. गोष्टीतल्या 'रॉबिनसनने'आणि 'कास्ट अवे' मधल्या नायकाने जगण्यासाठी धडपड करत एक सुंदर, उपयुक्त आणि स्वत:चे विश्व उभे केले. महाराष्ट्रातील आजच्या काळात शिकणा-या मुलांना, शिकवणा-या शिक्षकांना, अभ्यासकांना हे संकट एक संधी देत आहे. करून पाहिले पाहिजे!

-------------------------------------####---------------------------------------------------------------


अश्विनी गोडसे

संचालक

ग्राममंगल

९१६८९०२०१०

ashwinigodse@grammangal.org

co founder

LearnerCentric , you tube

https://www.youtube.com/channel/UCP_L5EdQoZ9NEjTnL-z3OaQ